जीवन मार्ग

संस्थापक : आर. बी. मोरे

संपादक
डॉ. अशोक ढवळे
कार्यकारी संपादक
विजय पाटील
संपादक मंडळ
अजित अभ्यंकर
डॉ. विठ्ठल मोरे
डॉ. उदय नारकर
सुभाष थोरात
डॉ. रमेशचंद्र पाटकर
राजीव देशपांडे
शोभा ठेकेदत्त
हिरा जनार्दन
प्राची हातिवलेकर

मुद्रक/प्रकाशक
डॉ. अशोक ढवळे

अक्षरजुळणी
आत्माराम पडवळ

मुखपृष्ठ व मांडणी
केतन शिंदे

व्यवस्थापक
चंद्रकांत शिंदे

प्रसिद्धी स्थळ
'जनशक्ती', पी. बी. मार्ग
वरळी, मुंबई - ४०० ०१३
फोन : ०२२-२४९५१५७६
फॅक्स : ०२२-२४९६१५२५
ई मेल : mahacpim@gmail.com

# मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिटब्यूरोचे निवेदन

*(मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिटब्यूरोची बैठक १९ फेब्रुवारी २०१७ रोजी नवी दिल्लीत झाल्यानंतर खालील निवेदन प्रसृत केले आहे.)*

## राज्य विधानसभा निवडणुका

माकप इतर डाव्या पक्षांसोबत उत्तर प्रदेश, पंजाब, उत्तराखंड आणि मणिपूर या राज्यांतील विधानसभेच्या निवडणुका लढवत आहे. उत्तर प्रदेशात माकपने २६ उमेदवार उभे केले असून उत्तराखंडमध्ये ६, पंजाबमध्ये १२ आणि मणिपूरमध्ये २ उमेदवार उभे केले आहेत.

डावे पर्यायी धोरण जनतेपुढे ठेवण्याच्या उद्देशाने माकप डाव्या पक्षांच्या सोबत या निवडणुका लढवत आहे. सध्या जनतेची गाऱ्हाणी विधानसभात ऐकली जात नसल्याने ती मांडण्यासाठी जनतेने संबंधित विधानसभांत डाव्या पक्षांच्या प्रतिनिधींची ताकद वाढवावी, असे आवाहन पक्ष करत आहे. जनतेच्या या महत्वाच्या समस्यांकडे त्या त्या सरकारचे लक्ष वेधावे, जनतेला अत्यंत आवश्यक असलेली मदत मिळावी यासाठी डावे पक्ष, आणि विशेषत: माकप, त्या सरकारवर दबाव निर्माण करतील.

ज्या मतदारसंघात माकप आणि डाव्या पक्षांचे उमेदवार नाहीत तेथे भाजप आणि धर्मांध शक्तींच्या उमेदवारांचा पराभव करण्याचे आवाहन पक्ष करीत आहे. तीव्र होणारे धार्मिक ध्रुवीकरण आणि जनतेवर वाढत जाणाऱ्या अभूतपूर्व आर्थिक ओझ्याविरुद्धचा लढा तीव्र करण्यासाठी माकप आणि डाव्यांची विधानसभांतील ताकद वाढणे गरजेचे आहे. या निवडणूक मोहिमेत जनतेवरील ओझ्यात वाढ करणाऱ्या नोटाबंदी'विरुद्धही आवाज उठवण्यात येत आहे.

## निवडणूक सुधारणा

या निवडणूक मोहिमेत राजकीय पक्षांना मिळणाऱ्या निधीबाबत जास्त पारदर्शकता गरजेची आहे, यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपचे नेते लक्ष केंद्रित करत आहेत. वस्तुत: पंतप्रधान आणि भाजप यांनीच स्वत:ला मिळणाऱ्या निधीविषयी पारदर्शकता दाखवली पाहिजे. आपल्या जाहीर सभांत ते पैशाची किती उधळण करत आहेत, हेच स्पष्ट दिसत आहे.

केंद्रीय अंदाजपत्रकात वित्तमंत्र्यांनी राजकीय निधी व्यवस्था स्वच्छ करण्यासाठी सुचवलेले उपाय म्हणजे नुसती धूळफेक आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या रु. २०,००० देणगीची मर्यादा २,००० रुपयांपर्यंत खाली आणणे, त्यावरील देणग्या डिजिटल रूपात देणे, देणगीदारांनी दिलेले निवडणूक रोखे राजकीय पक्षांनी विकणे हे फारसे परिणामकारक उपाय नाहीत.

लोकशाही प्रक्रियेला विकृत करणाऱ्या पैशाच्या अतिवापरावर बंधने घालायची असतील तर सर्वप्रथम राजकीय पक्षांना मिळणाऱ्या कार्पोरेट देणग्यांवर बंदी घातली पाहिजे, असे माकप कित्येक वर्षे सुचवत आला आहे. दुसरे म्हणजे, निवडणुकीत राजकीय पक्षांनी किती खर्च करावा, यावर मर्यादा घातली पाहिजे. सध्या उमेदवाराने वैयक्तिक रित्या करावयाच्या खर्चावर मर्यादा आहे, पण राजकीय पक्षांच्या खर्चावर कसलीही मर्यादा वा नियंत्रण नाही. भाजप सरकारच्या जवळजवळ तीन वर्षाच्या कार्यकाळात या सरकारने आमच्या या सूचना सरळसरळ धुडकावून लावल्या आहेत. गेली कित्येक वर्षे माकप निवडणूक सुधारणेविषयी अनेक महत्वाच्या सूचना करत आला आहे.

आंशिक प्रमाणशीर प्रतिनिधित्व स्वीकारण्यासाठी निवडणूक पद्धतीत बदल करावा अशी माकपची सूचना आहे. त्यामुळे सरकार बनवण्याच्या प्रक्रियेत जनतेच्या लोकशाही निवडीचे प्रतिबिंब पडेल. स्वातंत्र्यानंतर

आजवर आलेले जवळ जवळ प्रत्येक सरकार सार्वत्रिक निवडणुकीत ५० टक्क्यांहून कमी मते मिळवून बनलेले आहे. आजचे भाजपच्या नेतृत्वाखालील मोदी सरकार केवळ ३१ टक्के मते मिळूनही लोकसभेत बहुमतात आहे. ६९ टक्के मतदारांनी भाजपच्या विरोधात मतदान केलेले आहे. बहुमताची सत्ता म्हणजे लोकशाही या अर्थाने देशात कधीही लोकशाही राबवण्यात आलेली नाही. दोन मतदारसंघ एकत्र करून त्यात एका उमेदवाराने निवडणूक लढवायची आणि दुसऱ्या जागी पक्षाचा जाहीरनामा, धोरण आणि कार्यक्रम यांच्या आधारावर मतदारांनी पक्ष निवडून द्यायचा असा प्रस्ताव आपल्या पक्षाने ठेवलेला आहे. लोकांच्या लोकशाही निवडीचे प्रतिबिंब यात योग्य रीतीने पडेल. पैसा, जात या आधारे मतदान करायच्या प्रवृत्तीलासुद्धा प्रमाणशीर मतदानाने काही प्रमाणात आळा बसेल, कारण या पद्धतीत मतदार राजकीय पक्षांना त्यांचा कार्यक्रम आणि धोरणे यानुसार मतदान करतील.

इतर राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटना व आंदोलने यांच्यासोबत विचारविनिमय करून, भाकपच्या सहयोगाने, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष एक परिपूर्ण निवडणूक सुधारणा करण्याबाबत राष्ट्रीय परिषद लवकरच आयोजित करत आहे. आपल्या निवडणूक प्रक्रियेत सुधारणा करण्याचा अत्यंत गरजेचा व महत्वाचा मुद्दा स्वीकारण्याची तयारी असलेल्या इतर राजकीय पक्षांशी माकप संपर्क साधण्यासाठी पुढाकार घेईल.

## अनुसूचित जाती व जमातींवरील अन्याय

अनुसूचित जाती आणि जमातींसाठी केंद्रीय अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या अत्यंत तुटपुंज्या आर्थिक तरतुदीविषयी पॉलिटब्यूरो नाराजी व्यक्त करत आहे. योजना आयोग आणि या वर्षापासून पंचवार्षिक योजना बरखास्त केल्याने अनुसूचित जाती – जमातींसाठी असलेल्या उप-योजना, सब प्लॅन, जवळ जवळ संपुष्टात आल्या आहेत. त्यामुळे अनुसूचित जाती आणि जमातींसाठी मंजूर करता आली असती ती प्रचंड रक्कम मंजूर करण्यात आलेली नाही. या अर्थसंकल्पात एकूण आर्थिक तरतुदीपैकी केवळ २.४४ टक्के तरतूद अनुसूचित जातींच्या आणि १.४८ टक्के तरतूद अनुसूचित जमातींच्या कल्याणकारी योजनांसाठी केलेली आहे.

या पार्श्वभूमीवर इतर डावे पक्ष आणि दलित हक्कांशी निगडीत असलेल्या सामाजिक आंदोलनांना सोबत घेत माकप खालील मागण्या करत आहे:

१. अनुसूचित जाती आणि जमातींना नाकारण्यात आलेल्या अनुक्रमे ७१,१३९ कोटी व ३४,३४९ रुपयांची तरतूद ताबडतोब करण्यात यावी.

२. उत्तरदायित्व, सहभाग आणि पारदर्शकता सामावून घेण्यासाठी अनुसूचित जाती उप – योजना आणि अनुसूचित जमाती उप – योजना हे दोन्ही कायदे करावेत. या उप – योजनांच्या अंतर्गत केंद्र आणि राज्य अशा दोन्ही स्तरांवर पुरेशी आर्थिक तरतूद करून त्या योजनांची अंमलबजावणी व्हावी, यासाठी केंद्रीय कायदा आवश्यक आहे.

३. अनुसूचित जाती आणि जमातींसाठीच्या उप – योजनात महिलांसाठी समाविष्ट असलेल्या १० टक्के रक्कमेखेरीज महिलांना प्राधान्य मिळण्यासाठी विशेष यंत्रणा व व्यवस्था निर्माण केली पाहिजे.

४. अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकनंतर मिळणाऱ्या शिष्यवृत्तीतील १२,००० कोटी रुपयांचा अनुशेष त्वरीत भरून काढण्यासाठी तरतूद केली पाहिजे. अनुसूचित जाती – जमातीतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणात लाभ व्हावा यासाठी या निधीची पुनर्रचना करावी.

डावे पक्ष, दलित संघटना आणि सामाजिक आंदोलनांना सोबत घेत माकप या प्रश्नावर जनआंदोलन उभे करील, तसेच संसदीय व्यासपीठांवरही हे प्रश्न धसास लावील.

## दक्षिण आशियाई देशांवरील परिसंवाद

महान ऑक्टोबर समाजवादी क्रांतीचा शतकोत्सव साजरा करण्याचा भाग म्हणून केंद्रीय कमिटीच्या मागील बैठकीत ठरल्यानुसार नेपाळ, बांगलादेश, पाकिस्तान आणि श्रीलंका या देशांतील कम्युनिस्ट आणि कामगार पक्षांचा एक दोन दिवसीय परिसंवाद सप्टेंबर २०१७ मध्ये घेण्याचा निर्णय पॉलिटब्यूरोने घेतला. 'साम्राज्यवाद, धर्मांधता आणि मूलतत्त्ववाद – ऑक्टोबर क्रांतीची अनिवार्य प्रस्तुतता' हा या परिसंवादाचा विषय असेल.

## केंद्रीय कमिटी बैठक

केंद्रीय कमिटीची पुढील बैठक १८ – १९ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आली आहे. पॉलिटब्यूरोची बैठक १७ एप्रिल रोजी होईल.

**(अनुवाद : डॉ. उदय नारकर )**


# मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या मुखपत्रांची वार्षिक वर्गणी

## जीवनमार्ग - रु. ४००, लोकलहर - रु. २५०

## पीपल्स डेमॉक्रसी - रु. ३५०, मार्क्सिस्ट - रु. १००

*आपल्या संपूर्ण पत्त्यासहित मनी ऑर्डर/बँक ड्राफ्टने वर्गणी पाठविण्याचे पत्ते*

**व्यवस्थापक, जीवनमार्ग, जनशक्ती, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई - ४०००१३**


**(चेक/ड्राफ्ट फक्त 'जीवनमार्ग' या नावे पाठवावा)**

**इतर मुखपत्रे : मॅनेजर, लोकलहर/पीपल्स डेमॉक्रसी/मार्क्सिस्ट, १५ तालकटोरा मार्ग, नवी दिल्ली - ११०००१**

# क्रांतीच्या रोमांचक क्षणाचे प्रत्यक्ष दर्शन

**जॉन रीड**

***जॉन रीड हे एक पुरोगामी अमेरिकन लेखक आणि पत्रकार होते. ते अमेरिकन कामगार चळवळीचे एक प्रमुख नेतेही होते. एवढेच नव्हे तर ते अमेरिकेच्या कम्युनिस्ट पक्षाच्या संस्थापकांपैकी एक होते. १९१७ मध्ये ते रशियाला गेले आणि त्यांच्या लेनिनसोबत कित्येक भेटी झाल्या. त्यांनी आपले 'जगाला हादरवणारे दहा दिवस' (१९१९) हे गाजलेले पुस्तक जनतेच्या क्रांतीकारक लढ्याला अर्पण केले होते. निःस्वार्थीपणा आणि क्रांतीच्या गाभ्याचे अवलोकन करण्यासाठी जिवाला धोका पत्करण्याचे धाडस ही त्यांच्या स्वभावाची खास वैशिष्ट्ये होती.***




घड्याळाचे काटे ८.४० वर स्थिरावतात न स्थिरावतात, इतक्यात टाळ्यांच्या कडकडाटात, घोषणांच्या उद्घोषात अध्यक्षमंडळाचे मंचावर आगमन झाले. त्यांच्यात लेनिन - ग्रेट लेनिन - देखील होता. काहीसा ठेंगणा, जाडसर. मोठे डोके, टक्कल पडू लागलेले. बारीक डोळे आणि काहीसे उच्चभ्रू भाव दर्शवणारे नाक. उदार वृत्ती विलसणारे ओठ आणि भारदस्त हनुवटी, गुळगुळीत दाढी, तरीही त्याच्या त्या भूतकाळातील आणि भविष्यातील सुप्रसिद्ध दाढीच्या पाऊलखुणा उमटलेल्या. मळकट गबाळे कपडे, पॅन्ट तर पायाहून लांबच. जनतेचा महानायक म्हणून न शोभणारे व्यक्तिमत्व. तरीही इतिहासात कुणाही नेत्याहून अधिक प्रेम आणि भक्ती लाभलेला माणूस. एक आगळा वेगळा लोकनेता. केवळ बुद्धिमत्तेच्या जोरावर लोकनेता बनलेला. व्यक्तिमत्वात कसल्याही दृश्य रंगच्छटा नसलेला, विनोदबुद्धीचे वावडे असलेला, त्रयस्थपणा आणि कठोर निर्धाराचे मूर्तिमंत प्रतिक असलेला, व्यक्तिमत्वात कसलेही स्पष्ट जाणवणारे चित्रमय वैशिष्ट्ये नसलेला. पण त्याच्याकडे एक अद्वितीय गुण होता - अत्यंत गंभीर आणि सखोल कल्पना सोप्या करून सांगायची, ठोस परिस्थितीचे विश्लेषण करायची विलक्षण हातोटी. आणि वास्तवाच्या योग्य समजाच्या क्षमतेच्या जोडीला कमालीचे बौद्धिक धोके पत्करण्याची तयारी.

अस्पष्ट स्मितरेषा उमटलेले ओठ बोलताना जास्तच उघडतात. आवाज तसा घोगराच. अर्थात त्यात गोडव्याचा अभाव आहे, असे नाही. पण वर्षानुवर्षे बोलत राहिल्याने काहीसा कडक झालेला. एकसुरात बोलायच्या ढबीमुळे हा बोलायचे थांबायचाच नाही, असा ऐकणाऱ्यांचा समज व्हावा. एखाद्या वाक्यावर, शब्दावर जोर द्यायचा झाल्यास जरासा पुढे वाकायचा. हातवारे, हावभाव जवळजवळ नाहीतच. समोर हजारो साध्या माणसांचे चेहरे जिवाचे कान करून आपल्या नेत्याचे बोलणे ऐकत असलेले.

## युद्धखोर आक्रमकांना इशारा

''कामगार, सैनिक आणि शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींच्या सोव्हिएतच्या आधारावर झालेल्या ६ आणि ७ नोव्हेंबरच्या क्रांतीने बनवलेले कामगार, शेतकऱ्यांचे सरकार युद्धखोर आणि आक्रमक देशांपुढे न्याय्य आणि लोकशाहीयुक्त शांतता प्रस्थापित करण्याचा प्रस्ताव ठेवत आहे.''

"सर्व युद्धखोर आणि आक्रमक देशांचे सरकार आणि त्यांची जनता यांच्यासमोर आमचे सरकार तातडीने युद्धबंदी करून ती किमान तीन महिने कायम राखण्याचा प्रस्ताव ठेवत आहे. त्यायोगे या काळात एकही अपवाद न करता युद्धात सहभागी झालेल्या वा बळजबरीने ढकलल्या गेलेल्या सर्व देश आणि राष्ट्रकांच्या प्रतिनिधींना आवश्यक ती बोलणी करता येतील. इतकेच नव्हे, तर शांततेची परिस्थिती ठामपणे स्वीकारण्यासाठी सर्व देशांतील जनतेच्या प्रतिनिधींच्या अधिकृत सभा आयोजित करता येतील."

या घोषणेला प्रदीर्घ टाळ्यांच्या कडकडाटाने उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्या टाळ्या ओसरल्यानंतर लेनिन पुढे म्हणाला,

"हा प्रस्ताव या परिषदेने स्वीकारावा, असे आवाहन आम्ही करत आहोत. आक्रमक आणि युद्धखोर देशांच्या केवळ जनतेला उद्देशून आवाहन केल्यास शांतता प्रस्थापित होण्यास विलंब होऊ शकतो, हे ध्यानात घेऊन आम्ही त्या देशांच्या सरकारांनाही हे आवाहन करत आहोत.''

भाषणाचा शेवट करताना लेनिन म्हणाला,

''६ आणि ७ नोव्हेंबरच्या क्रांतीने सामाजिक क्रांत्यांचे युग सुरू झाले आहे... शांतता आणि समाजवाद प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने कामगार चळवळ निश्चित विजयी होईल आणि तिच्यावर नियतीने सोपवलेले कार्य ती पार पाडील..."

त्यांच्या या शब्दांत धीरगंभीर आणि जोमदार असे काही होते, ज्याने उपस्थितांची हृदये उसळून आली. लेनिन बोलू लागला, की लोक त्यावर का विश्वास ठेवायचे, हे त्यावेळी कळून चुकले.

याच शब्दांखातर त्या मार्च हुतात्म्यांनी आपले प्राण भूमीवर ठेवले होते; याच शब्दांखातर लाखो लोकांनी तुरुंगात आयुष्य कंठून मृत्यू पत्करला होता आणि देश सोडून सायबेरियातील खाणीत राब-राबत प्राणांची कुरवंडी केली होती. त्यांनी अपेक्षा केली तशी क्रांती आली नव्हती हे खरे; बुद्धिवाद्यांनी इच्छा केली तशीही ती आली नव्हती - पण ती आली होती मात्र - खडबडीत, जोमदार रूपात, कुठल्याही विशिष्ट सूत्रांवरील अविश्वासाने; भावविवशतेबद्दल वाटणाऱ्या तिरस्काराने.

लेनिन जमिनीबद्दलचा अध्यादेश वाचत होता...

दोन वाजता जमिनीविषयीचा जमिनीबद्दलचा अध्यादेश मताला टाकण्यात आला. केवळ एका मताचा विरोध होऊन शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींनी प्रचंड बहुमताने तो जल्लोषात मंजूर केला.

**(अनुवाद : डॉ. उदय नारकर)**

# ‘विक्राळ विषमता’

‘ऑक्सफॅम’ या आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्थेने अलीकडेच आर्थिक विषमतेवर अहवाल प्रसिद्ध केला तो नेहमीप्रमाणे जानेवारीमध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक मंचाच्या (वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम) वार्षिक बैठकीची वेळ साधूनच केला. या वर्षीच्या अहवालाचे शीर्षक आहे, ‘९९ टक्क्यांसाठीचे अर्थकारण.’ गेल्या वर्षीचे अहवालाचे शीर्षक होते. ‘१ टक्क्यासाठीचे अर्थकारण’ जानेवारी हा वर्षातला असा महिना असतो, जेव्हा जगभरातले अरबोपती स्वित्झर्लंडच्या समुद्रकिनाऱ्यावरील आलिशान पर्यटनस्थळी ‘जागतिक, प्रादेशिक आणि औद्योगिक कार्यक्रमपत्रिके’ला आकार मिळवून देण्यासाठी जमतात. शिवाय या बैठकीत ‘जगाची स्थिती’ सुधारण्यासाठी देशोदेशीचे राजकीय आणि व्यावसायिक जगातील नेतेही आवर्जून सहभागी होतात.

‘ऑक्सफॅम’ने विद्यमान अहवालाचे शीर्षक अमेरिकेत झालेल्या ‘वॉलस्ट्रीट ताब्यात घ्या’ (ऑक्युपाय वॉलस्ट्रीट) या आंदोलनाकडून उसने घेतलेले दिसते.‘आम्ही ९९ टक्के आहोत’ ही त्या आंदोलनाची ललकारी होती. या ललकारीतून अर्थकारणाच्या शिखरस्थानी असलेल्यांच्या उत्पन्नामध्ये होणाऱ्या भरघोस वाढीकडे जसा निर्देश होता तसाच दुसऱ्या बाजूला बहुसंख्य समाजाच्या वेतनामध्ये झालेल्या घटीचा आणि त्यामुळे त्यांच्या घसरलेल्या आर्थिक पतीचा आणि एकूणातील मंदीच्या स्थितीकडेही निर्देश होत होता. ‘क्रेडिट सुईस ग्लोबल वेल्थ डेटा बुक’ आणि फोर्बज्‌ची डॉलबोपतींची (अरबो डॉलर्सचे पती!) यादी या दोन आकडेवाऱ्यांवर ‘ऑक्सफॅम’चा हा अहवाल आधारित आहे. हा अहवाल आपल्याला सांगतो की, जगातल्या आर्थिक उतरंडीमध्ये शेवटच्या पन्नास टक्क्यांमध्ये असलेल्या लोकांकडे जगातली केवळ ०.२ टक्के संपत्ती आहे. आणि जर आपण शिखरस्थानी असलेल्या ८ डॉलबोपतींची (यातले ६केवळ अमेरिकेतच आहेत) संपत्ती एकत्र केली तर ती या शेवटच्या पन्नास टक्क्यांच्या एकत्रित संपत्तीपेक्षादेखील जास्त भरते.

या अहवालामध्ये थॉमस पिकेटीच्या ‘एकविसाव्या शतकातील भांडवल’ या महाग्रंथात विकसित भांडवलशाही देशांमध्ये वाढत्या विषमतेचे गतिशास्त्र उलगडून दाखवण्यात आलेले आहे, त्याचाही आधार घेतलेला आहे. गेल्या तीस वर्षात अमेरिकी अर्थकारणामध्ये वाढलेली वेतनांमधील विषमतेबद्दल ते म्हणतात. ‘तळाच्या पन्नास टक्क्यांच्या वेतनांमध्ये ० टक्क्यांनी वाढ झालेली असून शिखरस्थानी असलेल्या १ टक्का व्यक्तींच्या वेतनांमध्ये ३०० टक्क्यांनी वाढ झालेली आहे.’ ‘ऑक्सफॅम’च्या अहवालामध्ये आर्थिक विषमतेशी संबंधित अनेक प्रकारच्या माहितीवजा नोंदी देण्यात आल्या आहेत. उदाहरणार्थ, भारतातील माहिती क्षेत्रात काम करणाऱ्या एका कंपनीमध्ये त्या कंपनीत काम करणाऱ्या साधारण कामगाराला मिळणाऱ्या पगाराच्या ४१६ पट पगार कंपनीप्रमुखाला मिळतो. आणखी एक उदाहरण पाहा. बिल गेटस्‌ने २००६ मध्ये मायक्रोसॉफ्ट सोडल्यापासून त्याची मालमत्ता ५० टक्क्यांनी किंवा थेट रकमेत सांगायची तर २५ अब्ज डॉलर्सनी वाढलेली आहे, इ. इ.

आकस्मितपणे जेव्हा अशी सगळी माहिती येऊन आदळते तेव्हा सर्वसाधारण वाचकाची प्रतिक्रिया काय असू शकते? अर्थातच, या सर्व खुलाशांमुळे मोठा राग येऊ शकतो. पण लक्षात घेण्याजोगी बाब अशी आहे की, मालमत्तेतून मिळणारे उत्पन्न हेच शिखरस्थानी असलेल्या १ टक्का वर्गाला मिळणाऱ्या वेतनाचा खरा स्रोत असते. कारण कार्यकारी मंडळातील सदस्यांना मिळणारे वेतन हे ते करत असलेल्या कामापेक्षा त्यांच्याकडे असलेल्या मालमत्तेच्या आधारे निर्धारित होत असते. त्यामुळे जेव्हा एखाद्या वित्तीय समूहाच्या प्रमुख कार्यकारी अधिकाऱ्याला कमी वेतन मिळत असेल किंवा या वित्तीय संस्थेला कमी लाभ मिळत असेल तर त्याचा अर्थ असाच नसतो की, काम करून वेतन मिळवणाऱ्यांवर टाच न आणल्यामुळे मालमत्तेतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वाटा वाढलेला नाही, तर कदाचित प्रत्यक्ष उत्पादनातील वाढीमुळे समूहाचा लाभ वाढलेला आहे किंवा मालमत्तेच्या उत्पन्नातील दुसरा एखादा घटक वाढलेला आहे असाही त्याचा अर्थ असू शकतो.

एकूणात आजच्या काळातील विक्राळ, राक्षसी विषमतेसंबंधीच्या पुढे दिलेल्या बाबी आपण कायम लक्षात ठेवायला हव्यात.

एक, भांडवलशाहीच्या इतिहासामध्ये कायमच शिखरस्थानी असलेल्या १ टक्का वर्गाकडे अन्य ९९ टक्क्यांशी तुलनाही करता येणार नाही इतकी मालमत्ता असणे ही साधारण बाब होती. या नियमाला अपवाद १९१४ ते १९७५ हा काळ होता. या काळात दोन महायुद्धे झाली, रशिया आणि चीनमध्ये क्रांत्या झाल्या, महामंदी आली आणि दुसऱ्या महायुद्धानंतर कल्याणकारी राज्याची संकल्पना आली, जिचे प्राबल्य १९७५ मध्ये संपुष्टात आले.

दोन, या काळामध्ये मध्यमवर्ग हा दृश्यपटलावर आला. उपजीविकेसाठी लागणाऱ्या किमान वेतनाच्या कितीतरी अधिक उत्पन्न तो मिळवत होता, जेणेकरून त्याला त्याचे स्वत:चे घर करता येत होते. साहजिकच त्याच्याकडे मालमत्ता तयार होत होती आणि आपल्या मालमत्तेचे बाजारात मूल्य वाढावे यासाठी एक साधारण मध्यमवर्गीय शक्य ते सारे प्रयत्न करू शकत होता. या घडामोडींमुळे एक मोठा बदल असा घडला की, देशोदेशीचे राष्ट्रीय राजकीय प्रवाह उजव्या दिशेने वाहू लागले.

तीन, विषमतेमधील असाधारण वाढीबरोबरच इहवादी कुंठितता-आर्थिक वाढीचा दर मंदावणे, दखलपात्र बेरोजगारी आणि घटलेली रोजगारी, आणि क्षमतांचा अपुरा वापर-हातात हात घालून पुढे आली.

चार, महाकाय औद्योगिक समूहांमध्ये अत्यंत ताकदवान अशा व्यवस्थापकीय अभिजनांनी स्वत:साठीच्या परताव्याचे दर स्वत:च ठरवणे सुरू केले.

पाच, विशिष्ट प्रकारच्या वित्तीय साधनांमधील दखलपात्र साठ्याची खाजगी मालकी असण्यातून मालकांना शासन आणि अर्थकारणाच्या गाभ्याच्या घटकांवर नियंत्रण मिळवता येते. पैसा हाच सत्तेचा स्रोत असल्याने ज्या संस्था मोठ्या संख्येने शासकीय रोखे विकत घेत असतात त्या संस्थाच ते रोखे कोणत्या शर्तीखाली मिळतील हेही ठरवत असतात. त्यामुळे मतदारांपेक्षा शासकीय धोरणांवर त्यांचे अधिक नियंत्रण असते. असे नियंत्रण मिळवणे मतदारांसाठी जवळपास अशक्यकोटीतील बाब असते.

सहा, अमेरिकेसारख्या देशात आढळून येणाऱ्या उत्पन्न व मालमत्तेतील अक्षरश: बीभत्स स्वरूपाच्या असमान वितरणामुळे, प्रभुत्वशाली राजकीय आकार हा लोकशाहीपेक्षा धनिकशाहीच्या दिशेने घडतं.

सात, विषमतेचा अर्थ ‘जागतिक उत्तर’ आणि ‘जागतिक दक्षिण’ या संदर्भात, तसेच साम्राज्यवाद, बहुराष्ट्रीय कंपन्या, वर्ग, वंश, जात आणि पुरुषसत्तेच्या वास्तवातदेखील पाहावा व लावावा लागतो. आणि तसे केले की, जगभरामध्ये, पण मुख्यत: जागतिक दक्षिणेमध्ये, जिथे कार्यरत वेतनधारी श्रमिकांपेक्षा श्रमिकांची आरक्षित सेना ही प्रचंड मोठ्या संख्येने असते, विविध प्रकारच्या स्थितींमध्ये वंचना आणि वेदना सहन करत असलेले अब्जावधी लोक म्हणजे या ९९ टक्क्यांतील प्रातिनिधिक वर्ग म्हणून समोर येतात. या वास्तवाच्या पार्श्वभूमीवर ‘ऑक्सफॅम’चा अहवाल हा एक नैतिक शक्ती ठरून काही महाश्रीमंतांना आपल्याकडील काही पैसा आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्थांच्या कोषांकडे वळवण्यास कारणीभूत ठरू शकतो. महाभयानक विषमता निर्माण करण्यामध्ये भांडवलशाही बजावत असलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेकडे मात्र या अहवालात दुर्लक्ष झालेले आहे ही बाब अधोरेखित करण्याची गरज आहे.

***(‘ईपीडब्ल्यू’च्या २१ जानेवारी २०१७ च्या अंक क्र. ३ मधील संपादकीयाचा अनुवाद : ‘परिवर्तनाचा वाटसरू’मधून साभार)***

# मोदी सरकारची 'नोटाबंदी' : या कारवाईपायी सर्व काही गमावून बसलेले! भाग (२)

मोदी सरकारच्या 'नोटाबंदी'चा सर्वाधिक त्रास झाला देशाच्या सामान्य जनतेला. या विक्षिप्त कारवाईमुळे ज्या कामगारांना फार मोठ्या संख्येने रोजगार गमवावा लागला, त्यांच्याकडे एक नजर टाकूया.

★ २५ कोटी शेतमजूर व गरीब किसानांना 'नोटाबंदी'चा थेट फटका बसला, त्यांचे रोजचे कामच ठप्प झाले.

★ ४.५ कोटी बांधकाम कामगार, सुरत औद्योगिक क्षेत्रांतील ४ लाख कामगार, तिरुप्पुर येथील तयार कपडे बनविणाऱ्या विविध विभागांतील ४ लाख कामगार तसेच पालर दरीतील चर्मोद्योगांमध्ये काम करणारे ५० हजार कामगार 'नोटाबंदी'च्या कचाट्यात भरडले गेले.

आपला शेतकरी तर फार मोठ्या आर्थिक संकटात सापडला. टोमॅटो, कांदा, कडधान्ये, तांदूळ, गहू यांच्या लागवडीसाठी गुंतवणूक केलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादित मालासाठी ग्राहक मिळणे अशक्य होऊन बसले. परिणामी आपली उपज रस्त्यावर फेकून देण्याची त्यांच्यावर पाळी आली. लागवडीसाठी अनेक शेतकऱ्यांनी कर्ज घेतले होते. त्यांना अशी आशा होती की, चांगले उत्पन्न मिळाले तर कर्जफेड करता येईल; आगामी हंगामासाठी थोडीफार बचत करणे देखील शक्य होईल. परंतु उपरोध असा की, चांगले पीक येऊन विक्री अभावी शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आणि आता परिस्थिती इतकी बिकट आहे की, शेतीचा नवा हंगामा सुरू होत असताना, बी-बियाणे, खते, किटकनाशके यासाठीसुद्धा शेतकऱ्यांजवळ रोकड नाही. अशाप्रकारे नोटाबंदीच्या कैचीत सापडलेल्या आपल्या शेतकऱ्यांवर एक जीवघेणा दुहेरी हल्ला होत आहे.

'नोटाबंदी'मुळे आपल्या देशातील कामगारांना सुद्धा जीणे असह्य होत आहे. पैसा नाही असे कारण सांगून कित्येक कामगारांना त्यांचा पगार नाकारण्यात आला. छोट्या व मध्यम उद्योगांना (Small and Medium enterprises-SMES) टाळे ठोकल्यामुळे एकाएकी कामगारांच्या रोजगारांवर गदा आली. या परिस्थितीत थोडीफार सुधारणा होईल अशी आशा जरी बाळगली तरी कामगारांना त्यांचे रोजगार परत मिळण्याची शक्यता नसल्याचे सांगितले जात आहे.

'असोसिएशन ऑफ चेंबर्स ऑफ कॉमर्स'च्या (ASSOCHAM) एका सर्वेक्षणात असे म्हटले आहे की, नोटाबंदीमुळे छोटे व मध्यम उद्योग थंडावल्यामुळे त्याचा नकारात्मक परिणाम लगेचच रोजगारनिर्मितीवर होत आहे.

'स्टेट बँक ऑफ इंडिया'ने अलिकडेच केलेल्या छोट्या उद्योगांच्या सर्वेक्षणातून असे दिसून आले की, या क्षेत्राच्या २/३(दोन तृतीयांश) विभागातील उत्पादनाचे ४० ते ५० टक्के नुकसान झाले आहे.

वॉशिंग्टन विद्यापीठ आणि या विद्यापीठाचा भारतातील सहकारी यांनी 'नोटाबंदीचे परिणाम' या विषयावर केलेल्या एका अभ्यासातून असे दिसून आले की, नोटाबंदीच्या कारवाईमुळे मासिक कौटुंबिक उत्पन्नात घट होत होती. नोव्हेंबर महिन्यात कुटुंबाचे मासिक उत्पन्न सरासरी १० टक्क्यांनी घटले होते.

नोटाबंदीच्या प्रलंबित परिणामांतून बाहेर पडण्यास छोट्या व मध्यम उद्योगांना तीन महिन्यांपेक्षा अधिक काळ लागेल असे भाकीत काही अर्थशास्त्रज्ञांनी केले आहे.

चलनतुटवड्यामुळे कित्येक छोट्या उद्योजकांना व किरकोळ विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांना नेहमीच्या ग्राहकांना मुकावे लागले. कर्नाटक-तामीळनाडू सरहद्दीवरील छोट्या शहरांमध्ये केलेल्या पुनर्सर्वेक्षणातून असे दिसून आले की, या छोट्या उद्योगांमध्ये नोटाबंदीच्या सुरुवातीच्या काळात, विक्री ८० टक्क्यांपर्यंत घटली होती. डिसेंबरच्या अखेरपर्यंत विक्रीत काही प्रमाणात सुधारणा झाली असली तरी विक्रीत ३० टक्क्याची घट झाली होती.

'नोटाबंदीचा जबरदस्त तडाखा असंघटित क्षेत्राला बसला आहे. मच्छिमार, मळ्यात काम करणारे, दागदागिने तयार करणारे कामगार, रेशीम विणणारे विणकर, चर्मकार या सर्वांचे जीवनमान खालावत चालले आहे.

'Centrum Wealth Research'ने आपल्या अहवालात म्हटले आहे, 'असंघटित क्षेत्राला नोटाबंदीचा प्रचंड घाला सोसावा लागेल.'

बनारस वस्त्रोद्योग संघाचे प्रमुख म्हणतात, त्यांच्या वस्त्रोद्योगाला ७०% फटका बसला असून विणकरांना पगार देण्यासाठी त्यांच्यापाशी नगद नाही. परिणामी हजारोंच्या संख्येने विणकर बेरोजगार झाले आहेत.

काही लोकांच्या बाबतीत तर स्वत:ची बँकखातीच नसल्यामुळे आरोग्यविषयक निकड किंवा मृत्यूसारख्या अनपेक्षित प्रसंगांसाठी बाजूला काढून ठेवलेली ही रक्कम नोटाबंदीमुळे कामी आली नाही. काळजीपूर्वकपणे केलेली बचत व्यर्थ गेली!

तर अनेकांना आपल्याच खात्यांमध्ये जमा केलेले पैसे काढण्यास बँकांनी नकार दिल्यामुळे अगणित आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. शाळेची फी भरणे, हॉस्पिटल्सची बिले भरणे, वाहतूक खर्च करणे, एवढेच नव्हे तर घरासाठी किराणा माल मागविणे यासारखी नित्याची कामे करणे दुरापास्त होत आहे.

'नोटाबंदी' अंमलात आणून दोन महिने उलटल्यानंतरही नंदुरबारच्या आदिवासींना या कारवाईचे जाचक परिणाम भोगावे लागत आहेत. त्रिशूल गावचा दार्खिया पावरी दररोज पहाटे ३ वाजता उठून, ५ किलोमीटर पायपीट करून ७ वाजता 'धडगाव' गावी पोहोचण्यासाठी ६ वाजताची एसटी बस पकडतो. सरकारच्या 'घरकुल योजनेचा लाभधारक' असलेला हा आदिवासी घरबांधणीसाठी बँकेतून रक्कम काढायला रोज हा असा प्रवास करतो. त्याच्या झोपडीपासून त्यातल्या त्यात जवळची बँक आहे १५ किलोमीटर अंतरावर! आणि एवढा खटाटोप करून त्याच्या हातात २०००रु.पेक्षा अधिक रक्कम पडत नाही!

ग्रामीण जनतेला आपल्या गरजा भागविण्यासाठी सहकारी बँकावर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागते. परंतु सरकारने सहकारी बँकांना नोटा बदलून देण्यास परवानगी नाकारल्यामुळे खेड्यापाड्यांत रहाणाऱ्या व सहकारी बँकांवर निर्भर असलेल्या जनतेच्या हालअपेष्टांत आणखी भर

पडली आहे.

बँकातील एकूण ठेवीच्या साधारणत: ६० टक्के ठेवी केरळमधील सहकारी बँकांमध्ये जमा आहेत. अंदाजे १.२७ लाख कोटी रुपयांची पायाभूत ठेव या बँकांमध्ये आहे.

केरळमध्ये ७० टक्के कृषीविषयक उधारी (Credit) सहकारी बँकांच्या चारस्तरीय रचनेच्या माध्यमातून दिली जाते.

सहकारी बँका लोकशाही पद्धतीने चालविल्या जातात. बँकांचा कारभार जनतेच्या सहभागाने चालतो. केरळप्रमाणे अनेक राज्यांमध्ये सहकारी बँका सामान्य जनतेला बँकिंग व्यवहारांमध्ये सामावून घेण्याचे प्रतिनिधित्व करतात. असे असूनही केंद्र सरकारने या सहकारी बँकांसाठी पैशाच्या देवाणघेवाणीचा मार्ग बंद केला आहे. त्यांचे आर्थिक व्यवहार बंद करण्याची त्यांच्यावर सक्ती करण्यासाठी, आणि खातेदारांनी आपल्या ठेवी काढून घेण्यासाठी या सहकारी बँकांनी खातेदारांवर दबाव आणावा म्हणून केंद्र सरकारचे हे उपद्व्याप चालू आहेत. सहकारी बँकांशी असलेले नाते लोकांनी तोडावे व खाजगी बँकांकडे वळावे हा सरकारचा या मागचा हेतू आहे.

## या कारवाईपायी मालामाल झालेले!

'जनतेची सर्वच्या सर्व बचत (स्पंज पाणी शोषून घेतो त्यापद्धतीने) शोषून घेणे' म्हणजे 'नोटाबंदी' असे पंतप्रधानांनी म्हटले आहे. आणि ते खरे आहे. नोटाबंदीमुळे सामान्य जनतेला त्यांच्यापाशी असलेल्या ५०० व १०००च्या सर्वच्या सर्व नोटा बँकांमध्ये जमा कराव्या लागल्या. परिणामी बँकांतील ठेवी मोठ्या प्रमाणात वाढल्या. जमाखर्चाची आढावापत्रके एकाएकी 'छान' दिसू लागली. सप्टेंबर २०१६ सालची बँकांची स्थिति आणि आताची स्थिति यांची तुलना केली तर लक्षणीय फरक असल्याचे दिसून येते. त्यावेळी म्हणजे २०१६ साली 'Non Performing Assets'- म्हणजे सार्वजनिक बँकांकडून देशातील बड्या कॉर्पोरेट्सनी घेतलेल्या परंतु परतफेड न केलेल्या कर्जाची रक्कम, ज्याला निष्क्रीय संपत्ती असे गोंडस नाव देण्यात आले आहे. ६.५ लाख कोटीपेक्षा जास्त होती. कॉर्पोरेट्सना ही रक्कम फेडण्याची सक्ती करण्याऐवजी सरकारने बँकांनाच कर्जे रद्द करण्यास भाग पाडले. परिणामी बँका आर्थिक संकटात अडकून पडल्या आहेत.

घेतलेल्या कर्जाची परतफेड न केलेल्या बड्या भारतीय कॉर्पोरेट्सची माहिती गोळा करण्यासाठी बँकांनी स्थापन केलेल्या 'The Credit Information Bureau of India Ltd. (CIBIL) या कंपनीच्या अहवालात असे म्हटले आहे की, बँकींग व्यवहारात हेतूपुरस्सरपणे घोलमाल केलेले एकूण ५२२७ कॉर्पोरेट्स आहेत. (wilful defaulters) व त्यांचे भारतीय बँकांना ५६,५११ कोटी रुपयांचे देणे आहे. कर्जाची ही रक्कम या वर्षीच्या अंदाजपत्रकात सरकारने शेती व शेतीक्षेत्राच्या कल्याणासासाठी राखून ठेवलेल्या ३५,९८४ कोटी रुपयांच्या चक्क दीडपट आहे आणि आता बँकांना झालेला तोटा भरून काढण्यासाठी नोटाबंदीच्या मार्गे सरकार सामान्य जनतेचा, बँकांमध्ये भरलेला पैसा श्रीमंतांकडे पोहोचवित आहे. आपल्या शेतकऱ्यांनी, रिक्षाचालकांनी किंवा स्वत:चा धंदा करून पैसे कमविणाऱ्यांना घेतलेल्या कर्जाच्या बाबतीत सरकार अशी पाऊले कधी उचलेल का? शेतीक्षेत्रावरील संकटापायी अक्षरश: मेटाकुटीस आलेल्या शेतकऱ्यांची ७०,०००/- कोटी रुपयांची कर्जे माफ करण्यास सरकारचा साफ नकार आहे. परंतु कॉर्पोरेट्सनी घेतलेली लाखो कोटी रुपयांची कर्जे माफ करण्यास मात्र सरकार अति उत्सुक आहे.

२०१३ ते २०१५च्या दरम्यान २९ राष्ट्रीयीकृत बँकांनी एकूण १.१४ लाख कोटी रुपयांच्या कर्जावर पाणी सोडले होते. ही रक्कम या बँकांनी आधीच्या ९ वर्षांमध्ये माफ केलेल्या कर्जाच्या रकमेपेक्षा कितीतरी पटीने जास्त होती.

कर्ज फेड न केलेल्या महाभागांच्या यादीकडे एक ओझरती जरी नजर टाकली तरी कोणकोणते भारतीय कॉर्पोरेट्स त्यात आहेत ते कळेल.

★ मुकेश अंबानीच्या 'रिलायन्स इंडस्ट्रीज लि. कंपनीचे' (RIL) एकूण कर्ज आहे - १,८७,०७९ कोटी रु.

★ अनिल अंबानीच्या 'रिलायन्स ग्रुप'चे बँकांना १,२५,००० कोटी रुपयांचे देणे आहे.

★ अनिल अग्रवालच्या 'वेदान्त' कंपनीचे देणे आहे - १,०३,००० कोटी रु.

★ शशी आणि रवी रुईयाच्या'एस्सार ग्रुप कंपनीचे एकूण कर्ज आहे - १,०१,४६१ कोटी रु.

★ गौतम अदानीच्या 'अदानी ग्रुप' कंपनीचे देणे आहे - ९६,०३१ कोटी रु.

★ 'मनोज गौर यांच्या 'जेपी ग्रुप'चे कर्ज आहे - ७५,१६३ कोटीहून अधिक.

★ 'टाटा ग्रुप'चे कर्ज आहे - ७२,८६७ कोटी रु.

★ सज्जन जिंदालच्या 'जेएस्डब्लू' ग्रुपचे देणे आहे - ५८,१७१ कोटी रु.

★ जी. एम. रावच्या 'जीएमआर' ग्रुपचे देणे आहे - ४७,९७६ कोटी रु.

★ एल. मधुसूदन रावच्या 'लँको ग्रुपचे' देणे आहे - ४७,१०२ कोटी रु.

★ वेणुगोपाल धूतच्या 'व्हिडिओकॉन ग्रुप'चे कर्ज आहे - ४५,४०५ कोटी रु.

★ जीव्हीके रेड्डीच्या 'जीव्हीके ग्रुप'चे कर्ज आहे - ३३,९३३ कोटी रु.

या सर्व कॉर्पोरेट्सना बेजबाबदारपणे कर्जे दिल्यामुळे गोत्यात आलेल्या बँकांना तारुन नेण्यासाठी नोटाबंदीचा घाट घातला गेला. २००८च्या जागतिक आर्थिक संकटानंतर, कोणतीही किंमत मोजावी लागली तरी, या बँकांना वाचविण्यासाठी जागतिक पातळीवर चालू असलेल्या प्रयत्नांमध्ये भारत सरकारचा सहभाग होता आणि म्हणून सद्य परिस्थितीत गरिबांकडून नगद लुबाडणूक व ती रक्कम श्रीमंतांच्या स्वाधीन करून मोदी सरकारला कोसळणाऱ्या बँकांना वाचविण्याचे दायित्व पार पाडायचे आहे व 'नोटाबंदी'च्या मार्गाने सरकार ते साध्य करीत आहे.

याचा अर्थ नोटाबंदीचे 'एक नंबरचे लाभदायक' आहेत भारतीय कॉर्पोरेट्स भांडवलदार.

**(अनुवाद : शोभा ठेकेदत)**

# स्मरण : सुलभाताई ब्रह्मे

**सुभाष थोरात**

१ डिसेंबर २०१६ रोजी सुप्रसिद्ध मार्क्सवादी विचारवंत अर्थतज्ञ सुलभा ब्रम्हे यांचे निधन झाले. त्या एकट्या राहत. त्यांचे वय निधनसमयी ८४ वर्ष होते. अशा वयात एखादा आजार होणे, अंथरुणाला खिळून परावलंबी होणे महाभयंकर असते. ही गोष्ट मरणापेक्षाही भयंकर असते. सुलभाताई तर कमालीच्या स्वावलंबी. स्वत:साठी कोणाची मदत घेणे हे त्यांच्या स्वभावात बसणारे नव्हते. या अर्थाने आणि या पार्श्वभूमीवर त्यांचे चालता-बोलता निधन होणे बरेच म्हंटले पाहिजे.



मरणाच्या आदल्या रात्री त्या नोटबंदीवर लिहिल्या जाणाऱ्या पुस्तिकेचे शुद्धलेखन तपासत होत्या. (त्यांचा हा शेवटचा लेख 'चलनकल्लोळ' नावाने 'जीवनमार्ग'ने छापलेला आहे.) याचा अर्थ त्या अखेरपर्यंत कामगारवर्गीय क्रांतीच्या ध्येयासाठी कार्यरत होत्या. ज्याला आपण अखेरच्या श्वासापर्यंत म्हणतो, अगदी तंतोतंत तशाच पद्धतीने त्या कार्यरत राहिल्या. त्यांचे हे जाणे किमान आजच्या अवघड काळात जेव्हा त्यांच्या मार्गदर्शनपर लिहिण्याची नितांत गरज होती अशा वेळी त्या निघून जाणे जिव्हारी लागणारे आहे. त्यांची निरोगी प्रकृती पाहता त्या आणखी काही वर्षे निश्चितच कार्यरत राहू शकल्या असत्या. कारण चळवळीबद्दलची त्यांची आत्मीयता आणि इच्छाशक्ती याला खरेच तोड नव्हती.

त्यांनी कामगार क्रांतीचे ध्येय उराशी बाळगले होते. त्यासाठी जे जे काही देणे शक्य होते त्यापेक्षाही अधिक त्यांनी दिले आहे. आपला प्रत्येक श्वास त्यांनी चळवळीला अर्पीत केला होता. तरुणपणी खूप क्रांतिकारक असणारे प्रतिकुल परिस्थितीत निराशेत जातात, तत्वज्ञानावरील आणि चळवळीवरील त्यांचा विश्वास ढळतो अशी अनेक उदाहरणे आपल्या आजूबाजूला आहेत, पण सुलभाताई लाल झेंड्याच्या कट्टर समर्थक राहिल्या, कधीही निराश झाल्या नाहीत. भारतीय कम्युनिस्टांच्या पहिल्या पिढीचा हा दुर्दम्य आशावादी वारसा त्यांनी अखेरपर्यंत जपला.

प्रसिद्धीची हाव नाही. आपलेच नांव व्हावे. ही व्यक्तीगत धडपड नाही. केवळ जनतेचे प्रश्न पुढे यावेत हीच तळमळ. या तळमळीवरच सुलभा ताईंचे उभे आयुष्य उभे आहे. 'चांगले कम्युनिस्ट कसे बनावे' याचा हा वस्तुपाठ. जो आजच्या काळात दुर्मिळ होत चालला आहे. त्यांचे वय झाले होते. पण त्या, त्या अर्थाने कधीच म्हाताऱ्या झाल्या नाहीत. त्यांचा उत्साह अगदी अविश्वसनीय होता. समाजात उद्भवणाऱ्या प्रत्येक प्रश्नावर मार्क्सवादी दृष्टीने अतिशय सकस, पुराव्यासह लेखन करणं हा त्यांच्या व्यासंगाचा, अभ्यासाचा आणि वर उदधृत केल्याप्रमाणे तळमळीचा भाग होता. कित्येक कार्यकर्त्यांना त्यांनी उभे केले, कुठल्याही परताव्याची अपेक्षा न धरता. कार्यकर्त्यांनी चळवळीत टिकून रहावे. जनतेचे प्रश्न हिरीरीने पुढे आणावेत हीच त्यांची इच्छा असे. माझी आणि त्यांची चळवळीच्या ओघात कधीतरी ओळख झाली. त्यानंतर स्नेह जुळला. तसा तो त्यांच्या संपर्कात आलेल्या सर्वांसाठी समान होता. त्यात अमुकला जास्त महत्व, तमुकला कमी महत्व, या उपयुक्ततावादी भानगडीत त्या कधी पडल्या नाहीत. प्रश्न पुढे घेऊन जाण्यास, त्यावर काम करण्यास काही मदत होते की नाही ? हाच एकमेव निकष त्यांच्या स्नेहभावनेत होता. एक सच्ची कॉम्रेड्शीप त्यांनी सर्वांबरोबर निभावली. व्यक्तीवाद गळून पडल्याखेरीज हे शक्य होत नाही.

ओळखीचे रूपांतर जेव्हा चांगल्या मैत्रीत झाले, तेव्हा त्यांना मी एकदिवस 'जीवनमार्ग'साठी लिखाण करू शकाल काय ?' असा प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी होकार दिला आणि म्हणाल्या 'पण माझी भूमिका पक्षाच्या भूमिकेपक्षा वेगळी असेल तर चालेल का ?' मी म्हणालो. नाही चालणार, तुम्हाला ते पथ्य पाळावे लागेल. त्यांनी ते पथ्य अखेरपर्यंत पाळले. फक्त काश्मीरबद्दलच्या लेखाबाबत थोडी खर खर झाली. तेव्हा तेव्हा त्यांना मी म्हणालो, 'तुम्ही काश्मीरबद्दलच्या लेखात बुऱ्हान वाणीच्या या संदर्भात जी मते मांडली आहेत, ती अप्रत्यक्षपणे दहशतवादाच्या समर्थनात जात असावीत. पक्षाला ते मान्य नसावे. त्यानंतर त्यांचा अखेरचा लेख 'चलनकल्लोळ' त्यांनी 'जीवनमार्ग'ला पाठवला; आणि मला इ-मेल करून 'भूमिका पटत असेल तर छापावा' असे आवर्जून लिहिले. 'जीवनमार्ग'मध्ये गेली सात-आठ वर्षे त्यांनी सातत्याने लिखाण केले आहे. त्यांचे एक चांगले पुस्तक होऊ शकेल. एका अर्थाने पक्षकार्याला त्यांनी प्रत्यक्षपणे लावलेला हातभारच.

पुराव्याशिवाय लिखाण न करण्याची शिस्त त्यांनी थोर विचारवंत डी. डी. कोसंबी यांच्याकडून घेतलेली दिसते. त्यांच्या लिखाणात एकही वाक्य असे उडते आणि शेरेबाजीसारखे आढळणार नाही. एकदा माझ्या एका लेखात दलित पँथरमध्ये फुट का पडली ? या संदर्भात लिहिताना मी औरंगाबादच्या एका सभेत नामदेव ढसाळवर कार्यकर्त्यांनी भाकर फेकून 'तुझे भाकरीचे तत्त्वज्ञान आम्हाला नको' असे लिहिले होते.' तो संदर्भ ध्यानात ठेवून सुलभाताईंनी मला विचारले 'याला काही पुरावा आहे का ?' मी म्हणालो कागदोपत्री नाही, पण ही घटना प्रत्यक्ष पाहिलेले आणि सांगणारे लोक आहेत. त्या म्हणाल्या 'पुराव्याशिवाय असे काही लिहता कामा नये' मला हा तुमचा संदर्भ वापरायचा होता. पण आता पुरावाच नाही तर कसा वापरणार. पुराव्यासह लिखाण करण्याचा त्यांचा दृष्टीकोन वैचारिक स्वरूपाच्या आणि काही एक भूमिका मांडणाऱ्या लिखाणाला लागू होतो. आणि त्यांचे सर्व लिखाण या स्वरूपाचे आहे. कार्यकर्त्यांना भूमिका मांडण्यासाठी एक रसद पुरवावी हा दृष्टीकोन त्यांच्या लिखाणामागे दिसून येतो. 'कम्युनिस्टांनी पुराव्याशिवाय काहीही लिहू नये' असे त्या म्हणत. अशा लिखाणाला विश्वासार्हता नसते. मी त्यांना म्हणायचो 'स्फुट स्वरुपाच्या राजकीय लिखाणात असे थोडेफार स्वातंत्र्य घ्यावे लागते. पण त्यांना ते

कधी पटत नसे. त्यांनी लिहिलेल्या विषयांची विविधता पाहिली की, त्यांचा दांडगा व्यासंग अचंबित करतो. शिवाय या लिखाणाची खोली आणि 'सर्वांगिण मांडणी पाहता त्यांच्याबद्दलचा आदर शतपटीने वाढतो. आणि हे सगळं त्या करीत होत्या कुठलाही गाजावाजा न करता. आजच्या 'आवाजी' जमान्यात असे व्यक्तीमत्व दुर्मिळात दुर्मीळ म्हटले पाहिजे.

त्यांचा शेती प्रश्नांचा खूप मोठा अभ्यास होता. पण हा अभ्यास कोरडा नव्हता. शेतकऱ्यांना शेती कशी परवडेल ? यासंबधी अनेक व्यावहारी योजना त्यांनी मांडल्या आहेत. सेंद्रीय शेतीचे प्रयोग करून रासायनिक खते आणि बी-बियाणे निर्माण करणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या साम्राज्यवादी विळख्यातून शेतीची-शेतकऱ्यांची सुटका कशी होईल ? या संदर्भात त्या सातत्याने लिहित. या बाबतीतला प्रत्यक्ष एक प्रयोग त्यांनी रायगड जिल्ह्यात सुरू केला आहे.

भाषा आणि शिक्षण हा एक त्यांच्या अभ्यासाचा आणि आवडीचा विषय होता. या संदर्भात त्यांनी खूप लिहिले आहे. शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे हे तत्व जगभर मान्यता पावलेले आहे, पण आपल्याकडे ब्रिटिश साम्राज्यवादी सत्तेमुळे इंग्रजी माध्यमांचे वेड पसरलेले आहे, त्या विरुद्ध आपण चळवळ उभारून मराठी माध्यमातूनच शिक्षणाचा आग्रह धरला पाहिजे ही त्यांची भूमिका होती. खरेतर जगभरच वासाहतीक साम्राज्यवादी सत्तांनी आपली भाषा स्थानिक जनतेवर लादून, त्यांच्या भाषेचा-संस्कृतीचा नायनाट केला आहे. भारतात इंग्रजी सत्तेबरोबरच भाषा-शिक्षणाच्या संदर्भात जातीव्यवस्थेचेही संदर्भ आहेत. सुलभाताईंनी या सर्व वस्तुस्थितीचा परामर्श घेऊन भाषेच्या संदर्भात मांडणी केली आहे. ती पुढे घेऊन जाणे गरजेचे आहे.

भाजप म्हणजे संघपरिवार केंद्रात आणि राज्यात सत्तेवर आल्यानंतर आणि त्यांनी इतिहास, तत्त्वज्ञान, संस्कृती, कला-साहित्य या क्षेत्रात सनातन वैदीक संस्कृतीची घुसखोरी सुरू केल्यानंतर सुलभाताईंचे सर्व चिंतन या विषयाकडे वळले. त्यांनी अनेक लेख याविषयांसंबंधी लिहिले आहेत. जे आपण 'जीवनमार्ग'मध्ये छापले आहेत. हिंदुत्वाचा म्हणजे ब्राह्मण्याचा आधार हिंदूधर्म आहे. त्यामुळे या विचारांना शह द्यायचा असेल तर आपण विषमतावादी हिंदुधर्माचा त्याग केला पाहिजे. या निष्कर्षाप्रत त्या आयुष्याच्या अखेरच्या दिवसात आल्या होत्या. त्या संदर्भात त्यांनी एक टिपण विचारार्थ तयार केले होते. साम्राज्यवादी नवउदारवादी आर्थिक धोरणांच्या विरोधात संघर्ष करताना संस्कृतीच्या क्षेत्रात आपण धर्मांतराचा मार्ग अंगिकारला पाहिजे, असे या टिपणीचे सूत्र आहे. त्यांनी 'बौद्ध धम्म' हा चांगला पर्याय आहे, परंतु ज्यांना धम्मच नको आहे त्यांनी आम्ही हिंदुधर्माचा त्याग करतो, असे जाहीर करावे अशीही सूचना त्यांनी केली आहे. त्यांना या संदर्भात एक कृती कार्यक्रम घेऊन सुरुवात करण्याची इच्छा होती. पण ती अपुरी राहिली. आयुष्याने त्यांना तेव्हा उसंत दिली नाही.

त्यांच्या निधनाआधी दोन महिन्यापूर्वी मी त्यांची 'जीवनमार्ग'च्या विशेषांकासाठी व्हिडीओ मुलाखत घेतली आहे. 'जीवनमार्ग'चा विशेषांक वेगवेगळ्या कारणांमुळे रेंगाळत राहिल्यामुळे ती मुलाखत मी लिहून काढली नाही. सुलभाताईंनी दोन तीन वेळा फोन करून तुम्ही मुलाखत लिहिली का ? असे विचारले. 'मला ती दाखवा त्यात आणखी काही हवे असेल तर ते आपण लिहू'' पण अखेरपर्यंत मला मुलाखत लिहून काढणे जमले नाही, आणि त्या गेल्या. त्याबद्दल एक खंत मनात दादून राहिली आहे. मी ही मुलाखत व्हिडीओ रेकॉर्ड केली आहे. मी त्यांना म्हणालो तुमची मुलाखत खूप विचारप्रवण आहे. मी ती 'यू ट्युब'वर टाकतो. तर त्या भयंकर रागावल्या 'मला असल्या गोष्टी अजिबात आवडत नाहीत. मी यासाठी तुम्हाला परवानगी देणार नाही' असे त्या ठामपणे म्हणाल्या त्यांच्या या भावनेचा आदर राखून मी ही मुलाखत माझ्याजवळ जपून ठेवली आहे. ती लिहून काढली जाईल. पण या व्हिडीओत लहान मुलासारखं निरागस भाबडेपण चेहऱ्यावर जपणाऱ्या चालत्या बोलत्या सुलभाताई नेहमी पाहता येतील.

★ ★ ★

(डीवायएफआय अधिवेशन... पान १२ वरून)

परिवार किती हीन पातळीवर जाऊ शकतो, याचे हे उदाहरण आहे. देशातील तरुणांनी जनतेला धर्मनिरपेक्षता व लोकशाही मूल्यांकडे खेचून आणावे, असे आवाहन त्यांनी केले. या जाहीर सभेत उपस्थितांचे स्वागत सतीश एन. यांनी केले. अध्यक्षस्थानी मोहम्मद रियाज हे होते, तर आभारप्रदर्शन एर्नाकुलम जिल्हा डीवायएफआयचे अध्यक्ष प्रिन्सी कुरियाकोस यांनी केले.

## स्वागत समितीने केलेले पथदर्शक कार्य

स्वागत समितीने पी. राजीव व एम. स्वराज यांच्या नेतृत्वाखाली अत्यंत अभिनव उपक्रम राबवून अधिवेशन संपन्न केले, याची विशेष दखल घ्यायला हवी. या अधिवेशनाने दिलेल्या 'ग्रीन प्रोटोकॉल 'च्या हाकेनुसार पाचही दिवसात प्लास्टिकचा उपयोग पूर्णपणे टाळण्यात आला. सेंद्रीय शेतीतून तयार झालेले अन्नच वापरण्यात आले. अधिवेशनाच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून 'पेरियार नदी स्वच्छता मोहीम' राबवण्यात आली. जिल्ह्यातील १३ बेघरांकरता घर बांधून देण्याचा व ९२ मागासवर्गीय, गरीब होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणाकरता शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय संघटनेने घेतला. एक व्यसनमुक्ती मोहीम, पुस्तक प्रदर्शन तसेच ऐतिहासिक प्रदर्शनही भरवण्यात आले. 'युवा व अर्थसंकल्प' या विषयावर परिसंवाद भरवण्यात आला. या परिसंवादाचे उद्घाटन केरळचे अर्थमंत्री डॉ. थॉमस आयझॅक यांनी केले. प्रा. प्रभात पटनाईक आणि डॉ. रामकुमार या मान्यवरांचा परिसंवादात सहभाग होता. प्रकाश करात, प्रा. एम. के. सानू, मल्ल्याळी चित्रपट निर्माते कमल आणि स्वामी संदिपानंदगिरी यांच्या उपस्थितीत 'दांभिक राष्ट्रवाद आणि धर्मांधता' या विषयावरही परिसंवाद घेण्यात आला.

अधिवेशनाला उपस्थित असलेल्या सर्व प्रतिनिधींनी देहदानाची शपथ घेतली. हा सर्वत्र कौतुकाचा विषय ठरला. कॅन्सरग्रस्तांसाठी दीड लाखाचा निधी जमवण्यात आला व तो एर्नाकुलम वैद्यकीय महाविद्यालयाला सुपूर्द करण्यात आला.

## अत्यंत प्रेरणादायी अधिवेशन

'डीवायएफआय'चे हे दहावे अधिवेशन देशाच्या कानाकोपऱ्यातील सर्व तरुण नेतृत्वाकरता संघर्षातील अनुभवांचे आदानप्रदान करणारा अनुभव ठरला. अधिवेशनाने जुने बंध अधिक बळकट करीत, नवीन नाती जोडली. विविध क्षेत्रांतील प्रवाहांना एकत्रित बांधण्याचे केंद्र म्हणून अनेक मुद्दे उचलून धरत संघटनेच्या क्षितिजाचा विस्तार केला. सत्ता व संपत्तीच्या बळावर देशाला खिळखिळी करू पाहणाऱ्या या धर्मांधतेचा पराभव करून आधुनिक धर्मनिरपेक्ष राष्ट्र निर्माण करण्याचा कोची अधिवेशनाने दृढसंकल्प केला आहे.

**(अनुवाद : प्राची हातिवलेकर)**

# केरळ : कोची येथे डीवायएफआयचे १०वे अखिल भारतीय अधिवेशन संपन्न!

## रोजगार, धर्मनिरपेक्षता व लोकशाहीसाठी संघर्षाचा निर्धार!

प्रिती शेखर

भारताचा लोकशाहीवादी युवा महासंघाचे (डीवायएफआय) १०वे अखिल भारतीय अधिवेशन नुकतेच १ ते ५ फेब्रुवारी २०१७ दरम्यान केरळ राज्यात कोची येथे पार पडले. या अधिवेशनात देशभरातील सर्व पुरोगामी तरुणांना संघटित करून बेरोजगारी, धर्मनिरपेक्षता व लोकशाहीच्या रक्षणाकरता लढा देण्याचा दृढ निर्धार करण्यात आला. १ कोटी १५ लाख सभासदांचे प्रतिनिधित्व करणारे ६८० प्रतिनिधी या अधिवेशनात उपस्थित होते. त्यात महाराष्ट्रातील नऊ प्रतिनिधींसह दोन निरीक्षकांचा समावेश होता. परदेशांतील सहा भ्रातृभावी संघटनांचे प्रतिनिधी देखील उपस्थित होते.

केरळच्या कन्नूर जिल्ह्यातून अधिवेशनाची ज्योत घेऊन निघालेला, तिरुवनंतपुरम येथून अधिवेशनाचा ध्वजदंड घेऊन निघालेला तसेच कन्याकुमारी येथून अधिवेशनात फडकावला जाणारा ध्वज घेऊन निघालेला, असे तीन जथ्थे या अधिवेशनाची पूर्वतयारी म्हणून काढण्यात आले होते. या जथ्थ्यांना अडवण्याचा पोलिसांनी आटोकाट प्रयत्न केला. मात्र मोहम्मद रियाज यांच्या खंद्या नेतृत्वाखाली डीवायएफआयच्या शेकडो तडफदार कार्यकर्त्यांनी तो प्रयत्न उधळून लावत आपली आगेकूच सुरूच ठेवली. हे तीनही जथ्थे एर्नाकुलम येथील 'फिडेल कॅस्ट्रो नगर' या जाहीर सभेच्या ठिकाणी एकत्र आले. स्वागत समितीचे अध्यक्ष पी.राजीव यांनी या जथ्थ्याने सुपूर्द केलेला झेंडा फडकावला. यानंतर शहिद रोहित वेमुला याचे नाव देण्यात आलेल्या अधिवेशनस्थळी मशाल पेटवण्यात आली.

### उद्घाटन सत्र

अधिवेशनाचे उद्घाटन सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश गोपाल गौडा यांनी केले. आपल्या भाषणात त्यांनी वाढती बेरोजगारी, त्यामुळे निर्माण होणारी सामाजिक अस्वस्थता आणि धर्मांध शक्ती धर्माच्या नावावर करीत असलेले समाजाचे धृवीकरण याविषयी तीव्र चिंता व्यक्त केली. या सर्व प्रश्नांवर युवकांनी लोकशाही मार्गाने चळवळ उभी करण्याचे आवाहन त्यांनी केले. सरकार शिक्षणक्षेत्रात करीत असलेली अनावश्यक ढवळाढवळ, तसेच धर्मांध शक्ती जो हिंसाचार करत आहेत त्याची सरकार उघडपणे करीत असलेली पाठराखण, याचा निषेध म्हणून आपले 'पद्मभूषण' परत केलेले शास्त्रज्ञ पी.एम. भार्गव यांनी अधिवेशनाला व्हिडियोद्वारे शुभसंदेश पाठवला. तो यावेळी दाखवण्यात आला.

डोक्यावर मैला वाहून नेण्याच्या अमानवी पद्धतीचे उच्चाटन करण्याकरता काम केलेले 'मॅगेसेसे' पुरस्कार विजेते बेझवाडा विल्सन, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे नेते डॉ. हमीद दाभोलकर, कॉ. गोविंद पानसरे यांच्या स्नुषा व महिला नेत्या मेघा पानसरे, फिल्म इन्स्टिट्यूट विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष हरिशंकर नचिमुथु, जेएनयू विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष पी.पी. अंमल, हैद्राबाद केंद्रीय विद्यापीठ विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष कुलदीप सिंग या सर्वांनी अधिवेशनाला शुभेच्छा दिल्या. स्वागत समितीचे अध्यक्ष पी. राजीव यांनी उपस्थितांचे स्वागत केले. डीवायएफआयचे अध्यक्ष खासदार एम. बी. राजेश यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सत्रात वक्त्यांबरोबरच अनेक लेखक, कलाकार आणि मान्यवर नागरिकांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली होती. या सर्वांची उपस्थितीही, या कठीण काळात प्रतिभावंतांच्या अपेक्षा लोकशाहीवादी युवक चळवळीवर केंद्रीत झाल्याचेच द्योतक होते.

### अहवाल व ठराव

एम.बी.राजेश, सायंदीप मित्रा (प.बंगाल), राजेंद्र रिआंग (त्रिपुरा), संजय पासवान (झारखंड), दीपा (तामिळनाडू) आणि अर्शद अलि बाबा (जम्मू काश्मीर) यांचे अध्यक्षमंडळ स्थानापन्न झाल्यावर प्रतिनिधी सत्राला सुरुवात झाली.

डीवायएफआयचे सरचिटणीस अवोय मुखर्जी यांनी मुख्य अहवाल मांडला. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा थोडक्यात आढावा घेऊन त्यांनी देशांतर्गत प्रतिकूल परिस्थिती, तसेच जगभरातील साम्राज्यवाद्यांचा वाढता हस्तक्षेप यावर भाष्य केले. 'डीवायएफआय' या सर्व कठीण परिस्थितीला तोंड देत एकीकडे शिक्षण व रोजगाराच्या प्रश्नांवर युवकांना संघटित करीत आहे, तर दुसरीकडे विविध धर्मनिरपेक्ष शक्तींना एकत्र आणण्याचा देखील प्रयत्न करीत आहे. संघटनेविषयी एक वेगळा अहवालही एम.बी.राजेश यांनी मांडला. या दोन्ही अहवालांच्या मसुद्यांवर झालेल्या चर्चेत २२ राज्यांतून ७८ प्रतिनिधींनी भाग घेतला. राजकीय व संघटनात्मक अशा दोन्ही अहवालांवर महाराष्ट्रातून कैलास बलसाने, तनुजा जोशी, संजय कांबळे, राजेश खरपडे आणि संतोष ठाकूर या पाच प्रतिनिधींनी राज्याच्या वतीने आपली मते मांडली.

तब्बल बारा तास चाललेल्या या चर्चेत सर्व प्रतिनिधींनी धर्मांधता व सामाजिक मागासलेपणा विरुद्ध व उपजीविकेकरता लढा देत असताना प्रत्यक्षात आलेले अनुभव कथन केले. कार्यकर्त्यांनी कशा प्रकारे प्रतिगामी शक्ती, माफिया टोळ्या व पोलिसांच्या दडपशाहीचा सामना करीत विविध कार्यक्रम राबवले, हे या चर्चेतून स्पष्ट झाले. सर्व पातळीवरील संघटनात्मक उणीवांवरही मोकळेपणाने चर्चा झाली. या सर्वांवर मात करून आपापल्या भागांत जोरदार काम करण्याची व एक सळसळती युवा चळवळ उभारण्याची गरज सर्व प्रतिनिधींनी बोलून दाखवली. अवोय मुखर्जी व एम. बी. राजेश यांनी या चर्चेला समर्पक उत्तर दिल्यानंतर अहवाल एकमताने मंजूर झाला.

अधिवेशनात देशातील युवकांसमोरील आव्हाने, प्रदूषण, बेरोजगारी, शिक्षणाचे बाजारीकरण, धर्मांधता, जातीयवाद, शिक्षण संस्थांच्या परिसरात

होणारा भेदभाव बंद करण्याविषयीचा 'रोहित ॲक्ट' पास करणे, महिलांवरील अत्याचार, शेती अरिष्टाचा युवकांवर झालेला परिणाम, आदिवासी तरुणांचे अधिकार, काश्मीरातील अरिष्ट, छऱ्यांच्या बंदुकीतून केलेल्या गोळीबारामुळे अंधत्व आलेल्या युवकांना नोकऱ्या व त्यांच्या कुटुंबांना योग्य मोबदला, क्रीडाक्षेत्राचे बाजारीकरण, खोटा राष्ट्रवाद, तामिळनाडूत संघटनेला देशद्रोही ठरवण्याचा प्रयत्न, प. बंगाल राज्यात लोकशाही हक्कांवर आलेली गदा, सार्वजनिक आरोग्याची हेळसांड, नैतिकतेच्या नावावर होणारी छळवणूक, अल्पसंख्याक तरुणांना लक्ष्य करणे, प. आशियातील परिस्थिती, मादक पदार्थांचे सेवन, हुंडापद्धत, खोट्या प्रतिष्ठेपायी होणाऱ्या हत्या, २०१७च्या अर्थसंकल्पाचा युवकांवर होणारा परिणाम, खाजगी कंपन्यांत नोकऱ्यांचे आरक्षण, शहरांतील रोजगाराची हमी देणारा कायदा, अशा विविध विषयांवरचे एकूण ३२ ठराव संमत करण्यात आले.

या अहवाल व ठरावांतून प्रकर्षाने समोर आलेली बाब ही की, 'डीवायएफआय' ही संघटना सर्व पुरोगामी विचारांच्या तरुणांचे एक व्यापक व्यासपीठ म्हणून पुढे येत आहे. या व्यासपीठावर येणाऱ्या विषयांची व्याप्ती वाढवली तर केवळ संघटनाच मजबूत होईल असे नाही, तर विविध क्षेत्रांत सुरु असलेल्या न्यायाच्या लढ्यांनाही बळकटी येईल.

या संदर्भात, अधिवेशनाने साम्राज्यवादविरोध आणि भांडवलशाही विरोधाच्या लढाईला अर्थहीन ठरविणाऱ्या आधुनिकोत्तरवादासारख्या (पोस्ट मॉडर्निझम) विचारसरणींचा सामना करण्याची हाक दिली. ही विचारधारा केवळ साम्राज्यशाहीचीच पाठराखण करणारी आहे. अशा वैचारिक भ्रष्टाचाराशी दोन हात करणे व तरुणांना त्यापासून रोखणे, हे 'डीवायएफआय'समोरील महत्वाचे कार्य आहे.

मानवजातीच्या विकासास मुख्य अडथळा ठरणाऱ्या साम्राज्यवादी जागतिकीकरणाला विनातडजोड विरोध करणारी लोकशाही युवा चळवळच फक्त भेदभाव आणि विषमतेविरुद्ध एकजुटीच्या लढ्यांना चालना देऊ शकते, हे या अधिवेशनाने अधोरेखित केले.

## भ्रातृभावी शुभेच्छा

क्यूबा, पोर्तुगाल, ग्रीस, श्रीलंका आणि 'बांगलादेश येथील भ्रातृभावी संघटनांचे प्रतिनिधी अधिवेशनाला उपस्थित होते. 'बांगलादेश युवा संघटने'चे डॉ.साजेदुल रुबेल यांनी डीवायएफआय ही संघटना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व जमात-ए-इस्लामी सारख्या धर्मांध संघटनांना मागे टाकून पुढे जाईल, असा विश्वास व्यक्त केला. 'यूथ युनिटी ऑफ बांगलादेश'च्या सरचिटणीस सबाह अलि कोलिन्स, श्रीलंकेच्या 'समाजवादी विद्यार्थी संघटने'च्या राष्ट्रीय संघटक रंगना देवप्रिया, 'कम्युनिस्ट यूथ ऑफ ग्रीस'च्या केंद्रीय कमिटी सदस्य अथान्सियोस एसगोरस, 'पोर्तुगीज कम्युनिस्ट यूथ'च्या केंद्रीय सचिवमंडळ सदस्य ड्यूआर्ट आल्व्हज, 'क्युबन मिशन'चे प्रमुख मेरीलिडीस मोरालेस या सर्व आंतरराष्ट्रीय चळवळीतील नेत्यांनीही अधिवेशनाला शुभेच्छा दिल्या. क्युबाच्या प्रतिनिधीमंडळाने डीवायएफआय व क्युबन जनतेच्या घनिष्ठ संबंधांचा उल्लेख केला. स्पेन, द. आफ्रिका आणि पाकिस्तान या देशातील संघटनांनी पाठवलेले शुभसंदेश यावेळी वाचून दाखवण्यात आले. पाकिस्तान व द. आफ्रिकेचे प्रतिनिधी भारत सरकारने व्हिसा नाकारल्यामुळे उपस्थित राहू शकले नाहीत. भारत सरकारच्या या मनमानी व संकुचित दृष्टिकोनाचा अधिवेशनाने निषेध केला.

शहिद रोहित वेमुलाची आई राधिका वेमुला यांचेही अत्यंत भावपूर्ण भाषण झाले. त्याचे भाषांतर रोहितचा भाऊ राजा याने केले. आपल्या भाषणात त्यांनी भेदभाव व शोषण याविरुद्ध लढणाऱ्या सर्व शक्तींना एकत्र येण्याचे आवाहन केले.

'अभाजमसं'च्या सरचिटणीस मरियम ढवळे, 'सीटू'चे एम.साईबाबू, 'अखिल भारतीय शेतमजूर युनियन'चे अध्यक्ष एस. थिरूवनकरसू, 'अखिल भारतीय किसान सभे'चे सहसचिव विजू कृष्णन, 'एसएफआय'चे सरचिटणीस विक्रम सिंग, 'ऑल इंडिया यूथ फेडरेशन'चे सरचिटणीस थिरुमलाई रामन, 'आयआयवायएल'चे जोसी जॉर्ज यांनी अधिवेशनाला शुभेच्छा दिल्या. 'डीवायएफआय'चे माजी अध्यक्ष एम.ए.बेबी, पी. श्रीरामकृष्णन आणि के. एन. बालगोपाल यांची देखील यावेळी भाषणे झाली. संघटनेचे पहिले अखिल भारतीय अध्यक्ष ई.पी.जयराजन यांनी अधिवेशनाला शुभसंदेश पाठवला.

## नवीन नेतृत्व

८३ सदस्यांची नवीन केंद्रीय कमिटी यावेळी निवडण्यात आली. या कमिटीने पी. ए. मोहम्मद रियाज यांची नवीन अध्यक्ष म्हणून, तर अवोय मुखर्जी यांची सरचिटणीस व बलबीर प्रसाद यांची कोषाध्यक्ष म्हणून फेरनिवड केली. महाराष्ट्राच्या सरचिटणीस प्रीती शेखर यांची सहसचिवपदी तर अध्यक्ष सुनिल धानवा व राज्य पदाधिकारी कैलास बलसाने यांची केंद्रीय कमिटी सदस्य म्हणून निवड झाली.

एम.बी.राजेश, पुरण चंद, दिनेश सिवाच, टी.व्ही.राजेश, रामरतन बगडिया, के. भास्कर, नयन भुयान, भगवान भोजने या निवृत्त झालेल्या नेत्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला. प्रत्येक कमिटीत किमान २० टक्के महिला व त्यात किमान २ तरी सचिवमंडळ सदस्य असलेच पाहिजेत. अशी घटनादुरुस्ती या अधिवेशनाने केली. तसेच कला, संस्कृती, माहिती, क्रीडा या क्षेत्रातील तरुणांना 'मानद सदस्य' म्हणून कमिटीवर घेण्याचीही घटनादुरुस्ती यावेळी करण्यात आली.

## विशाल युवा रॅली व जाहीर सभा

अधिवेशनाची सांगता तरुणांच्या एका प्रचंड रॅलीने झाली. जागेअभावी केवळ एर्नाकुलम जिल्ह्यातील तरुणांनीच सहभागी व्हावे, असा निर्णय होऊनही एक लाखावर तरुण या रॅलीत सहभागी झाले. जाहीर सभेचे उद्घाटनपर भाषण मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस खासदार सीताराम येचुरी यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणात मोदी सरकारमुळे देशातील जनतेचे प्रचंड हाल होत असून युवकांनी लोकशाही समाज व लोकशाही राजकारणाच्या पुनर्स्थापनेकरता संघर्ष करण्याचे आवाहन तरुणांना केले. भूतपूर्व केंद्रीय मंत्री ई.अहमद यांच्या पार्थिव देहाला जी वागणूक मिळाली, ते पाहता या सरकारची सांस्कृतिक पातळी किती खालावली आहे, हेच दिसून येते, असेही ते म्हणाले.

केरळचे मुख्यमंत्री पिनरायी विजयन यांनी आपल्या भाषणात भारतावर घोघावत असलेल्या धर्मांधतेवर हल्ला चढवला. ज्ञानपीठ विजेते यू.आर. अनंतमूर्ती मृत्युशय्येवर असताना हिंदुत्व संघटनांनी त्यांना पाकिस्तानचे विमान तिकीट पाठवल्याच्या हिडीस घटनेची त्यांनी आठवण करून दिली. संघ

(पान १० पहा)

# अभाविपची गुंडागर्दी आता थेट पुणे विद्यापीठात! युवा व विद्यार्थ्यांचा जोरदार प्रतिकार

प्रीती शेखर

दिल्लीच्या रामजस महाविद्यालयातील घटना ताजी असतानाच अभाविपच्या गुंडांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसराकडे आपली वक्रदृष्टी वळवली आहे. २४ फेब्रुवारीच्या रात्री पुणे विद्यापीठात पीएचडी करीत असलेले स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एस.एफ.आय.) च्या विद्यापीठ युनिटचे अध्यक्ष नासिर शेख, एमएचे विद्यार्थी व संघटनेचे सचिव संदीप मारबळ, दुसरे दोन पीएचडी करीत असलेले कार्यकर्ते सतीश गोरे, सतीश पाडळकर, एम.फिल.चे विद्यार्थी सतीश देबाडे या चौघांना अभाविपच्या गुंडांनी विद्यापीठ परिसरातच बेदम मारहाण केली. एवढेच नव्हे, तर याच कार्यकर्त्यांना पोलीस स्टेशनमध्ये नेऊन त्यांच्यावरच उलट केसेस ठोकल्या. पोलिसांनी देखील या सत्ताधाऱ्यांच्या बगलबच्च्यांपुढे नांगी टाकत ‘ विद्यार्थ्यांच्या दोन गटांतील हाणामारी’ असे सर्वस्वी चुकीचे रूप या घटनेला दिले.

प्रत्यक्षात घडले ते असे : रामजस महाविद्यालयातील घटना, भाजप आमदार प्रशांत परिचारक यांनी सोलापुरातील सभेत जवानांच्या पत्नींवर केलेली अत्यंत अपमानास्पद टिप्पणी, शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी तंत्रनिकेतन विद्यार्थ्यांना दिलेली धमकी, तसेच नुकताच अभाविपने औरंगाबाद विद्यापीठातील काही दलित विद्यार्थ्यांवर केलेला हल्ला या चारही घटनांनी पुणे विद्यापीठाचा परिसर ढवळून निघाला होता. या सर्व घटनांचा निषेध करण्याकरता एस.एफ.आय.ने विद्यापीठ परिसरातच एका निदर्शनाचे आयोजन केले होते. या निदर्शनाची पत्रकं लावत असताना अभाविपच्या गुंडांनी या चारही कार्यकर्त्यांना जबरदस्त मारहाण केली. जाहीर संवाद वा इतर लोकशाही व्यवस्थेतील उपलब्ध मार्गांनी चर्चेच्या माध्यमाने जर हे प्रकरण हाताळले गेले असते, तर अभाविप तोंडघशी पडणार, हे उघड होते. म्हणूनच त्यांनी असा बळाचा वापर केला.

मात्र याचा परिणाम उलटा होऊन अभाविपच्या या झोटिंगशाहीमुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड नाराजी पसरली व या गुंडगिरीला विरोध करण्याकरता युवा व विद्यार्थी एकत्र आले. २७ फेब्रुवारीला विद्यापीठाच्या गेटवर एसएफआयने अभाविप करीत असलेला हिंसाचार, त्यात पोलिसांचा खोडसाळ हस्तक्षेप आणि विद्यापीठ प्रशासनाचा लोकशाहीविरोधी पवित्रा, या सर्व घटनांचा निषेध करण्याकरता जी निषेध निदर्शने आयोजित केली होती, त्यात शेकडो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

डीवायएफआयच्या बॅनर खाली पुणे शहरातील अनेक युवा स्वयंसेवक त्यांना येऊन मिळाले. ही निदर्शने चिरडण्याच्या तयारीने आलेल्या पोलिसांनी आंदोलकांची प्रचंड संख्या पाहून काढता पाय घेतला. या निदर्शनांना एसएफआयचे केंद्रीय कमिटी सदस्य दत्ता चव्हाण, राज्य अध्यक्ष मोहन जाधव, पुणे विद्यापीठ युनिटचे अध्यक्ष नासिर शेख, तसेच डीवायएफआय चे पुणे जिल्हा अध्यक्ष ज्ञानेश्वर मोटे यांनी मार्गदर्शन केले. हे सर्व नेते नंतर कुलगुरूंना भेटण्यास गेले. अभाविपच्या गुंडांवर कडक कारवाई करून विद्यापीठ परिसराची लोकशाही परंपरा कायम ठेवावी, अशी मागणी त्यांनी कुलगुरूंकडे केली.

याच दिवशी राज्यभरातील अनेक शहरांत एसएफआय व डीवायएफआयच्या नेतृत्वाखाली युवा व विद्यार्थ्यांनी रस्त्यावर येऊन अभाविप-भाजप-संघ या त्रिकुटाविरुद्ध क्रांतिकारी गाणी गायली, घोषणाबाजी केली, त्यांचे पुतळे जाळले. जुन्नर, कराड, जळगाव, दिंडोरी, सोलापूर, बीड, नांदेड विद्यापीठ, परभणी, अमरावती शहर, नांदगाव खंडेश्वर व इतर अनेक ठिकाणी उग्र निदर्शने करण्यात आली. राज्याच्या विविध भागांतील या निदर्शनांचे नेतृत्व एसएफआयचे राज्य सचिव बालाजी कलेटवाड, तसेच सुनिल राठोड, रोहिदास जाधव, मंजुश्री कबाडे, मीरा कांबळे, सोमनाथ निर्मळ, रामेश्वर शेरे, तर डीवायएफआयच्या सचिव प्रीती शेखर, तसेच कैलास बलसाने, महारुद्र डाके, गणेश दराडे या व इतर अनेक नेत्यांनी केले.

मुंबईत देखील निदर्शने करण्यात आली. सुप्रसिद्ध सिनेनिर्माते आनंद पटवर्धन, अखिल भारतीय किसान सभेचे सहसचिव डॉ.अशोक ढवळे, अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या सरचिटणीस मरियम ढवळे, इंडियन मुस्लिम्स फॉर सेक्युलर डेमॉक्रसी या संघटनेचे फिरोज मिठीबोरवाला, डीवायएफआयचे माजी राज्य सरचिटणीस शैलेंद्र कांबळे व इतर अनेक सन्मान्य नागरिक या युवा व विद्यार्थ्यांच्या निषेध निदर्शनांना उपस्थित होते.

आपल्या भाषणात, आनंद पटवर्धन यांनी अभाविपची कुंडली मांडत ही संघटना महात्मा गांधींचा खून केल्यावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने निर्माण केलेली त्यांचीच शाखा असल्याचे सांगितले. या विद्यार्थी, शिक्षकांना धमकावत फिरणाऱ्या संघटनेला कुठलीही देशभक्तीची परंपरा तर नाहीच उलटपक्षी ब्रिटिश साम्राज्यवाद्यांना माफीनामा लिहून देणाऱ्या सावरकरांची परंपरा आहे, असेही ते म्हणाले.

डॉ. अशोक ढवळे यांनी आपल्या भाषणात २०१४ साली मोदी सरकार सत्तेत आल्यापासून देशभरातली सर्वच शैक्षणिक परिसरातील स्वातंत्र्य व लोकशाही संकुचित होत चालल्याची बोचरी टीका सरकारवर केली. रोहित वेमुलाची झालेली संस्थात्मक हत्या, जेएनयूतील विद्यार्थ्यांवर होणारे हल्ले, नजीबचे अपहरण, तसेच पुणे, दिल्ली, जेएनयू, अलाहाबाद, जादवपूर,व इतर अनेक विद्यापीठांत अभाविपच्या सहभागाने होत असलेल्या हल्ल्यांना आलेले उधाण बघता, लोकशाहीवर होणाऱ्या गंभीर हल्ल्यांची सहज कल्पना येते. या हल्ल्यांत अभाविप हा बिनीचा शिलेदार असला, तरी त्यांचा बोलविता धनी सत्ताधारी भाजप हाच आहे, असेही ते म्हणाले.

मरियम ढवळे आपल्या भाषणात म्हणाल्या, की गुरुमेहर कौर प्रकरणातील अभाविपने दिलेली हीन प्रतिक्रिया हे त्यांच्या व संपूर्ण संघ परिवाराच्याच संकुचित, पितृसत्ताक मानसिकतेचे उदाहरण आहे. लाखो लोक उपासमारीने व कुपोषणाने मरत असताना, सत्ताधारी मात्र लोकांनी काय खावे, काय घालावे, कोणाशी लग्न करावे, अशा निरर्थक गोष्टींत मग्न आहेत.

धर्मांध शक्तींचा आज महाराष्ट्रातील राजकारण व समाजकारण या दोन्हींवर वरचष्मा आहे, ही वस्तुस्थिती आहे. हे मान्य करायलाच हवे. मात्र ज्या शेकडोंच्या संख्येने व हिमतीने युवा व विद्यार्थी पुणे विद्यापीठातील गुंडगिरीचा निषेध नोंदवण्याकरता एकत्र आले, तसेच राज्यभरात इतरत्रही निदर्शने करण्यात आली, ते पाहता या हुकुमशाहीविरूद्धची मोहीम जोर पकडते आहे, हे स्पष्ट होते. ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे. **(अनुवाद : प्राची हातिवलेकर)**

# पक्षाच्या राज्य सचिवमंडळाची व राज्य कमिटीची बैठक

## बेलापूर - दि. २४ मार्च २०१७

नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा निकाल व त्यातील आपल्या पक्षाची कामगिरी यांचा आढावा घेण्यासाठी पक्षाच्या राज्य सचिवमंडळाची बैठक शुक्रवार, दि. २४ मार्च २०१७ रोजी सकाळी ११ वाजता, आणि राज्य कमिटीची बैठक त्याच दिवशी दुपारी ३ वाजता, कॉ. बी. टी. रणदिवे स्मारक भवन, बेलापूर येथे भरेल. पक्षाचे केंद्रीय सचिवमंडळ सदस्य निलोत्पल बसू हजर राहतील.

सर्व सदस्यांनी (१) यंदाच्या महानगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व नगरपालिकांच्या निवडणुकीचा आपल्या जिल्ह्यातील राजकीय आढावा, (२) वरील सर्व निवडणुकींत आपल्या पक्षाच्या उमेदवारांना मिळालेली नेमकी मते (लेखी स्वरूपात), (३) राज्य कमिटी सभासदांची वर्गणी व लेव्ही, (४) पक्ष, 'जनशक्ती प्रकाशन' व 'जीवनमार्ग'ची सर्व थकबाकी आणि (५) सर्व पक्ष मुखपत्रांच्या वर्गण्या, या साहित्यासह या बैठकीसाठी अवश्य वेळेवर हजर राहावे.

**– नरसय्या आडम, राज्य सेक्रेटरी**

# पक्षाची विस्तारित राज्य कमिटी बैठक

## बेलापूर - दि. २५-२६ मार्च २०१७

कोलकाता पक्ष संघटना प्लीनमने दिलेल्या निर्देशानुसार, महाराष्ट्रातील पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी पक्षाची विस्तारित राज्य कमिटी बैठक शनिवार, दि. २५ मार्च २०१७ रोजी सकाळी ११ वाजता कॉ. बी. टी. रणदिवे स्मारक भवन, बेलापूर, नवी मुंबई येथे सुरू होईल व ती रविवार, दि. २६ मार्च रोजी सायंकाळी संपेल. या बैठकीसाठी पक्षाचे सरचिटणीस खासदार सीताराम येचुरी व केंद्रीय सचिवमंडळ सदस्य निलोत्पल बसू हजर राहतील.

राज्य कमिटीत ठरल्यानुसार, प्रत्येक जिल्हा कमिटीने २०० पक्ष सभासद व उमेदवारांमागे १ प्रतिनिधी या बैठकीसाठी निवडायचा आहे. सर्व राज्य कमिटी सदस्य पदसिद्ध प्रतिनिधी असतील. तसेच सहा मुख्य जनआघाड्यांचे राज्य अध्यक्ष व राज्य सचिव हेही पदसिद्ध प्रतिनिधी असतील. या बैठकीची प्रतिनिधी फी प्रत्येकी रु. ४०० असेल व ती राज्य कमिटी सदस्यांसह सर्व प्रतिनिधींना भरायची आहे. सर्व जिल्ह्यांचे या महत्त्वाच्या बैठकीत प्रतिनिधित्व असले पाहिजे.

**– नरसय्या आडम, राज्य सेक्रेटरी**

# महाराष्ट्र राज्य किसान कौन्सिल बैठक

## बेलापूर - दि. २७ मार्च २०१७

महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक रविवार, दि. २६ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता आणि राज्य कौन्सिलची बैठक सोमवार, दि. २७ मार्च रोजी सकाळी १० वाजता कॉ. बी. टी. रणदिवे भवन, बेलापूर येथे भरेल. राज्य कौन्सिलची बैठक त्याच दिवशी सायंकाळी संपेल.

सर्व सदस्यांनी या बैठकीसाठी अवश्य हजर राहावे आणि येताना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील आपल्या कार्याचा अहवाल, २०१६-१७ ची जिल्ह्यातील सर्व सभासदवर्गणी आणि काउंटरफॉईल्स आणि किसान सभेच्या सर्व साहित्याची थकबाकी हे साहित्य अवश्य सोबत घेऊन यावे.

| | | |
|---|---|---|
| **किसन गुजर** | **अर्जुन आडे** | **डॉ. अजित नवले** |
| **अध्यक्ष** | **कार्याध्यक्ष** | **सरचिटणीस** |